# सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका पोटनिवडणूक २०२१

## जाहिर प्रकटन

मा.प्रभारी सचिव राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे क्रमांक /रानिआ/मनपा-२०२०/प्र.क्र.३/का.५ दिनांक ०२ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या आदेशान्वये सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका प्रभाग क्र १६ अ पोटनिवडणूकीसाठीची प्रारुप मतदार यादी मी नितीन कापडणीस मुख्य निवडणूक अधिकारी तथा आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका याव्दारे प्रसिध्द करीत आहे. सदर प्रभाग क्रं १६ ची प्रारुप मतदार यादी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका मुख्यालय सांगली, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली, अपर तहसिलदार कार्यालय सांगली, प्रभाग समिती क्र.०१ सांगली, ड्रेनेज विभाग कार्यालय हिराबाग वॉटर वर्क्स सांगली , तलाठी कार्यालय राजवाडा चौक सांगली तसेच महापालिकेच्या www.smkc.gov.in या संकेतस्थळावर आज दिनांक १६/०२/२०२१ रोजी नागरीकांना पाहणेसाठी आणि निरीक्षण करण्यासाठी ठेवणेत आलेली आहे. या प्रारुप मतदार यादीवरील हरकती व सूचना दिनांक १६/०२/२०२१ ते २३/०२/२०२१ अखेर कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात प्रशासकीय अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका मुख्यालय, राजवाडा चौक, शहर पोलीस ठाणे समोर, सांगली येथे स्विकारल्या जातील. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकती व सूचना स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घेणेत यावी.

*स्वाक्षरी/-*
**(नितीन कापडणीस)**
**मुख्य निवडणूक अधिकारी (तथा)**
**आयुक्त,**
सांगली मिरज कुपवाड शहर
महानगरपालिका

जा.क्रं/मनपा/प्रशावि/सां/ ३७२/२०२०-२१
सांगली मिरज कुपवाड शहर
महानगरपालिका
दिनांक :-१५/०२/२०२१